# इतिहास – राज्यशास्त्र : बोर्डाची कृतिपत्रिका ( मार्च 2021 )

**वेळ : 2.00 तास ]** **[ एकूण गुण : 40**

**नोंद :** कोव्हिड-19 मुळे ही परीक्षा घेण्यात आली नाही.

# इतिहास – राज्यशास्त्र : बोर्डाची कृतिपत्रिका ( सप्टेंबर 2021 )

## (आदर्श उत्तरांसह)

**वेळ : 2.00 तास ]** **[ एकूण गुण : 40**

**सूचना :** *(1) सर्व कृती/प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.*

*(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे/कृतींचे गुण दर्शवतात.*

*(3) प्रश्न/कृती **1** ते **5** इतिहासावर; तर प्रश्न/कृती **6** ते **9** राज्यशास्त्रावर विचारलेल्या आहेत.*

*(4) प्रश्न क्रमांक 1. (अ) व प्रश्न क्रमांक 6. मध्ये संपूर्ण विधाने लिहिणे आवश्यक आहे.*

*(5) प्रश्न क्रमांक 2. (अ) आणि 8. (ब) मध्ये दिलेली संकल्पनाचित्रे कृतिपत्रिकेनुसारच पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.*

*(6) प्रश्न क्रमांक 1. (ब) मधील प्रत्येक संचातील फक्त चुकीची जोडी ओळखून लिहिणे अपेक्षित आहे.*

*(7) प्रश्न क्रमांक 1. (अ), 1. (ब) व 6 या प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिलेली असल्यास, प्रथम लिहिलेली उत्तरेच गुणांसाठी गृहीत धरली जातील.*

---

**प्र. 1. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा :** **3**

(1) 'आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज' हा ग्रंथ ------------------ याने लिहिला.

*(अ) कार्ल मार्क्स (ब) मायकेल फुको (क) लुसिआँ फेबर (ड) व्हॉल्टेअर*

(2) जगातील सर्वांत प्राचीन संग्रहालय ---------------------- शहराचे उत्खनन करताना सापडले.

*(अ) दिल्ली (ब) हडप्पा (क) उर (ड) कोलकाता*

(3) महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री ------------------ यांच्या कारकिर्दीत मराठी विश्वकोश निर्मितीस चालना मिळाली.

*(अ) यशवंतराव चव्हाण (ब) वसंतराव नाईक*

*(क) वसंतदादा पाटील (ड) शंकरराव चव्हाण*

**प्र. 1. (ब) पुढील प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून लिहा :** **3**

**(1)** (i) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल – रिझन इन हिस्टरी
(ii) लिओपॉल्ड व्हॉन रांके – द थिअरी अँड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी
(iii) हिरोडोटस – द हिस्टरीज
(iv) कार्ल मार्क्स – डिस्कोर्स ऑन द मेथड

**(2)** (i) महाराज सयाजीराव विद्यापीठ – दिल्ली
(ii) बनारस हिंदू विद्यापीठ – वाराणसी
(iii) अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी – अलिगढ
(iv) जिवाजी विद्यापीठ – ग्वालियर

**(3)** **वृत्तपत्रे** **संपादक**

(i) बेंगॉल गॅझेट — जेम्स ऑगस्टस हिकी

(ii) दर्पण — बाळशास्त्री जांभेकर

(iii) मराठा — गोपाळ गणेश आगरकर


(iv) प्रभाकर — लोकमान्य टिळक

**प्र. 2. (अ) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा : *(कोणत्याही दोन)*** **4**


**(1) पुढील आकृतिबंध पूर्ण करा :**

| | |
|---|---|
| जेम्स मिल | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
| जेम्स ग्रँट डफ | -------------------------- |
| -------------------------- | द हिस्टरी ऑफ इंडिया |
| श्री. अ. डांगे | -------------------------- |
| -------------------------- | हू वेअर द शूद्राज |

**(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :**




**(3) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :**



**प्र. 2. (ब) थोडक्यात टिपा लिहा : *(कोणत्याही दोन)*** **4**

(1) ॲनल्स प्रणाली

(2) अभिलेखागार

(3) कृषी पर्यटन.

**प्र. 3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा : *(कोणतीही दोन)*** **4**

(1) तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

(2) आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे.

(3) प्रसारमाध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन करून घ्यावे लागते.

(4) सध्याच्या काळात खेळांचे अर्थकारण बदलले आहे.

**प्र. 4. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून, त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **4**

मेजर ध्यानचंद हे भारतीय हॉकीचे खेळाडू आणि संघनायक होते. त्यांच्या नेतृत्वाखाली १९३६ साली भारतीय हॉकी संघाने बर्लिन ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्या पूर्वी १९२८ आणि १९३२ मध्येही भारतीय हॉकी संघाने सुवर्णपदके जिंकली होती; तेव्हा ध्यानचंद हे भारतीय संघाकडून खेळले होते. २९ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय क्रीडादिवस' म्हणून पाळला जातो. त्यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हणतात. १९५६ मध्ये त्यांच्या हॉकीतील कामगिरीबद्दल त्यांना 'पद्मभूषण' या सन्मानाने विभूषित करण्यात आले.

**प्रश्न :**

(1) 'हॉकीचे जादूगार' कोणास म्हणतात? **(1)**

(2) १९३६ साली ऑलिम्पिक स्पर्धा कोणत्या शहरात झाल्या? **(1)**

(3) हॉकी खेळाविषयी आपले स्वमत मांडा. **(2)**

**प्र. 5. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : *(कोणतेही दोन)*** **6**

(1) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहासलेखनातील योगदान स्पष्ट करा.

(2) ग्रंथालय व्यवस्थापन का महत्त्वाचे आहे?

(3) दूरदर्शनचा इतिहास स्पष्ट करा.

(4) मैदानी खेळ व बैठे खेळ यांच्यातील फरक स्पष्ट करा.

**प्र. 6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पुन्हा लिहा :** **2**

(1) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी --------- जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

*(अ) २५ टक्के* *(ब) ३० टक्के* *(क) ४० टक्के* *(ड) ५० टक्के*

(2) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी -------------- करण्यात आली.

*(अ) जलक्रांती* *(ब) हरितक्रांती* *(क) औद्योगिकक्रांती* *(ड) धवलक्रांती*

**प्र. 7. पुढील विधाने *चूक* की *बरोबर* ते सकारण स्पष्ट करा : *(कोणतीही दोन)*** **4**

(1) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता वाढली आहे.

(2) निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करतो.

(3) लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्त्व असते.

**प्र. 8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा : *(कोणतीही एक)*** **2**


(1) प्रादेशिक पक्ष

(2) ग्राहक चळवळ.


**प्र. 8. (ब) दिलेल्या सूचनांप्रमाणे कृती करा : *(कोणतीही एक)*** **2**

- **पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा :**

**(1)**




**(2)**




**प्र. 9. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा : *(कोणताही एक)*** **2**

(1) मतदारसंघांची पुनर्रचना याविषयी थोडक्यात माहिती लिहा.

(2) राजकीय पक्षांची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

# बोर्डाच्या कृतिपत्रिकेची उत्तरे (सप्टेंबर 2021)

**प्र. 1. (अ)**

(1) 'आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज' हा ग्रंथ मायकेल फुको याने लिहिला.

(2) जगातील सर्वांत प्राचीन संग्रहालय उर शहराचे उत्खनन करताना सापडले.

(3) महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या कारकिर्दीत मराठी विश्वकोश निर्मितीस चालना मिळाली.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**

(1) कार्ल मार्क्स — डिस्कोर्स ऑन द मेथड.

(2) महाराज सयाजीराव विद्यापीठ — दिल्ली.


(3) प्रभाकर — लोकमान्य टिळक.

**प्र. 2. (अ)**


**(1) आकृतिबंध :**

| जेम्स मिल | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
|---|---|
| जेम्स ग्रँट डफ | ए हिस्टरी ऑफ द मराठाज् |
| माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन | द हिस्टरी ऑफ इंडिया |
| श्री. अ. डांगे | प्रिमिटिव्ह कम्युनिझम टु स्लेव्हरी |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर | हू वेअर द शूद्राज |

**(2) संकल्पनाचित्रे :**



(3)




**प्र. 2. (ब)**

**(1) ॲनल्स प्रणाली :**

(१) राजकीय अभ्यासाबरोबरच स्थानिक लोक, तत्कालीन हवामान, व्यापार, शेती, तंत्रज्ञान, दळणवळण व संपर्काची साधने, सामाजिक विभागणी आणि समूहाची मानसिकता यांचाही अभ्यास करणे महत्त्वाचे मानले जाऊ लागले. या विचारप्रणालीलाच 'ॲनल्स प्रणाली' असे म्हणतात.

(२) 'ॲनल्स' (Annals) म्हणजे वार्षिक इतिवृत्त. घटना ज्या काळात घडली तिचा केवळ राजकीय नव्हे; तर तत्कालीन सामाजिक, आर्थिक इत्यादी सर्वांगांनी अभ्यास केला पाहिजे; असे मानणारी 'ॲनल्स प्रणाली' फ्रेंच इतिहासकारांनी विसाव्या शतकात प्रथम विकसित केली. ॲनल्स प्रणालीमुळे इतिहासलेखनास एक निराळीच दिशा प्राप्त झाली आहे.

**(2) अभिलेखागार :**

(१) ऐतिहासिक दस्तऐवज ज्या ठिकाणी जतन करून ठेवलेले असतात, त्या ठिकाणास 'अभिलेखागार' असे म्हणतात.

(२) अभिलेखागारांमध्ये महत्त्वाची जुनी कागदपत्रे, दप्तरे, जुने चित्रपट, जागतिक करारांचे ऐवज इत्यादी जतन करून ठेवले जातात.

(३) अभिलेखागारांमुळे मूळ कागदपत्रांचे संदर्भ मिळतात. तत्कालीन ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करता येतो. तत्कालीन भाषा, लिपी यांचा शोध घेता येतो. कालगणना करता येते. ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांना हस्तांतरित करता येतो.

(४) भारताचे दिल्ली येथील राष्ट्रीय अभिलेखागार हे आशिया खंडातील सर्वांत मोठे अभिलेखागार आहे. भारतातील प्रत्येक राज्याचे स्वत:चे स्वतंत्र अभिलेखागारही आहे.

**(3) कृषी पर्यटन :**

(१) शेती आणि शेतीशी संबंधित उपक्रम पाहण्यासाठी केलेला प्रवास, म्हणजे 'कृषी पर्यटन' होय.

(२) अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात कृषी संशोधने चालू आहेत. त्यासाठी भारतभर कृषी संशोधन केंद्रे आणि कृषी विद्यापीठे स्थापन झालेली आहेत.

(३) कोणत्या पिकांना कोणती माती योग्य, तिचा दर्जा, गांडूळ शेती, शेततळी, फळबागा इत्यादी उपक्रम काही भागांत घेतले जातात. सिक्कीमसारखे राज्य सेंद्रिय उत्पादक राज्य म्हणून घोषित झाले आहे.

(४) पावसाचे प्रमाण कमी असूनही इस्राएलसारख्या देशाने शेतीच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली. हे सर्व अभिनव प्रकल्प व उपक्रम तसेच शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माहितीसाठी शेतकरी, विद्यार्थी, शहरी लोक जात असतात. परदेशी लोकही येतात. यामुळे आज कृषी पर्यटन झपाट्याने वाढत आहे.

**प्र. 3.**

**(1)** (१) लाखो वर्षांच्या वाटचालीत मानव प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यात नवनवी कौशल्ये अवगत करीत गेला.

(२) दगडांपासून हत्यारे तयार करणे, शेतीचे तंत्र अशी वाटचाल करीत तो विज्ञानयुगात पोहोचला.

(३) कृषी उत्पादन, वस्तूंचे उत्पादन, स्थापत्य, अभियांत्रिकी इत्यादींमध्ये बदल होत गेले.

(४) यांत्रिकीकरणामुळे उत्पादन वाढले.

ही सर्व प्रगती समजून घेण्यासाठी आपल्याला तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

**(2)** (१) जहाज, रेल्वे आणि विमान या वाहतूक क्षेत्रांत झालेल्या प्रगतीमुळे आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय पर्यटन सोपे झाले आहे.

(२) विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती व आर्थिक उदारीकरण यांमुळे जग अधिक जवळ आले आहे.

(३) अभ्यास, व्यवसाय, चित्रपटांचे चित्रीकरण यांसारख्या विविध कारणांसाठी लोक जगभरातील ठिकाणांना भेटी देतात.

(४) खेळ, आंतरराष्ट्रीय परिषदा, संमेलने, ऐतिहासिक-धार्मिक स्थळे पाहणे या उद्देशांनीही लोक जगभर हिंडत असतात.

त्यामुळे आजच्या काळात लोकांचे परदेशात जाण्याचे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढत आहे.

**(3)** (१) प्रसारमाध्यमांद्वारे आपल्यासमोर येणारी माहिती वास्तवाला धरून असेलच असे नसते.

(२) ही माहिती देणाऱ्या प्रसारमाध्यमांचे हेतू, सरकारी धोरण, सामाजिक परिस्थिती अशा अनेक बाजू विचारात घेणे आवश्यक असते.

(३) प्रसारमाध्यमांचे पूर्वग्रह, दृष्टिकोन हेही त्या माहितीत दडलेले असतात.

(४) जर्मनीतील 'स्टर्न' या साप्ताहिकाने हिटलरने लिहिलेल्या रोजनिश्या प्रसिद्ध केल्या. पुढे ती हस्तलिखिते बनावट असल्याचे सिद्ध झाले.

म्हणून प्रसारमाध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन करून घ्यावे लागते.

**(4)** (१) विसाव्या-एकविसाव्या शतकात खेळांचे आंतरराष्ट्रीयीकरण झाले आहे.

(२) सर्वच सामन्यांचे थेट प्रक्षेपण जगाच्या कानाकोपऱ्यांत एकाच वेळी होत असते. ज्यामुळे हौशी खेळाडू शिकण्यासाठी; तर प्रेक्षक मनोरंजनासाठी सामने पाहतात.

(३) निवृत्त खेळाडूंना समालोचनासाठी विविध वाहिन्यांवर बोलावले जाते.

(४) सामने पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रेक्षकवर्ग येतो. त्यामुळे कंपन्या मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करून आपल्या उत्पादनाच्या जाहिराती खेळांच्या प्रक्षेपणादरम्यान करीत असतात.

या कारणांमुळे सध्याच्या काळात खेळांचे अर्थकारण बदलले आहे.

**प्र. 4.**

**(1)** मेजर ध्यानचंद यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हणतात.

**(2)** १९३६ साली जर्मनीमधील बर्लिन या शहरात ऑलिम्पिक स्पर्धा भरवण्यात आल्या होत्या.

**(3)** (१) हॉकी हा भारताचा 'राष्ट्रीय खेळ' मानला जातो. अनेक ऑलिम्पिक गेम्समध्ये हॉकीमध्ये भारताने सुवर्णपदके मिळवली आहे.

(२) मेजर ध्यानचंद यांना त्यांच्या हॉकीतील देदीप्यमान कामगिरीमुळे 'हॉकीचे जादूगार' असे म्हटले जाते.

(३) त्यांच्या कारकिर्दीत भारताने १९२८, १९३२ आणि १९३६ अशा सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांत सुवर्णपदके मिळवली होती.

(४) त्यांच्या या कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' या सन्मानाने भूषवले होते.

२९ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस भारतात 'राष्ट्रीय क्रीडादिवस' म्हणून पाळला जातो.

**प्र. 5.**

**(1)** भाषाशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र आणि इतिहासलेखन यांत मूलभूत संशोधन करणाऱ्या वि. का. राजवाडे यांचे इतिहासलेखनातील योगदान पुढीलप्रमाणे :

(१) राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' असे शीर्षक असणारे २२ खंड संपादित केले.

(२) इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन होय, हा विचार मांडला.

(३) केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी केलेली कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकिकती म्हणजे इतिहास नव्हे, असे त्यांचे मत होते.

(४) आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे, हा विचार त्यांनी भारतीय इतिहासकारांना दिला.

(५) अस्सल कागदपत्रांच्याच आधारे इतिहास लिहिला गेला पाहिजे, याबाबत ते आग्रही होते.

(६) स्थळ, काळ व व्यक्ती या त्रयींनी बद्ध झालेल्या मानवी प्रसंगांचे वर्णन इतिहासलेखनात असायला हवे, असे त्यांचे मत होते.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी केलेले ऐतिहासिक लेखन व मांडलेली मते हे इतिहासलेखनाला दिलेले मोठे योगदान आहे.

**(2)** ग्रंथालय म्हणजे केवळ ग्रंथांचा संग्रह करणे नव्हे; संग्रह केलेल्या ग्रंथांचे व्यवस्थापन होणे महत्त्वाचे असते.

(१) ग्रंथांच्या पद्धतशीर आयोजनामुळे वाचकांना हवी ती पुस्तके लगेच मिळू शकतात.

(२) कोणते पुस्तक नेमके कोठे ठेवले आहे, ते त्वरित सांगता येऊ शकते. त्यामुळे पुस्तकांचा शोध घेण्यात ग्रंथालय व्यवस्थापनाचा आणि वाचकांचा दोन्हींचाही वेळ फुकट जात नाही.

(३) उत्तम व्यवस्थापनामुळे ग्रंथांचे जतन व संवर्धनही चांगल्या प्रकारे होते. पुस्तकांचा विध्वंस होत नाही.

(४) ग्रंथालयाचे व्यवस्थापन जाणकार असेल; तर ग्रंथालयात उत्तम दर्जाच्या ग्रंथांचे संकलन केले जाते. त्यामुळे चोखंदळ वाचकांना उत्तम दर्जाची पुस्तके मिळू शकतात.

(५) एकाच प्रकारच्या विषयाच्या पुस्तकांचा संग्रह न होता, विविध प्रकारच्या पुस्तकांना ग्रंथालयात स्थान मिळते. उत्तम व्यवस्थापनामुळे ग्रंथांची सूची, संगणकीय प्रणाली, अन्य आधुनिक सोयी वाचकांना उपलब्ध होऊ शकतात.

(६) कल्पक व्यवस्थापक ग्रंथालयाचा वाचकवर्ग वाढवण्यासाठी ग्रंथांचे प्रदर्शन भरवणे, जाहिरात करणे अशा विविध मार्गांचा अवलंब करून ग्रंथालयाचा विस्तार करतात. यासाठी ग्रंथालय व्यवस्थापन उत्तम असणे महत्त्वाचे असते.

**(3)** (१) १९५९ साली भारतात दूरचित्रवाणी सुरू झाली. १५ सप्टेंबर १९५९ रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी दिल्ली दूरचित्रवाणी केंद्राचे उद्घाटन केले.

(२) सुरुवातीचे 'दूरचित्रवाणी' हे नाव बदलून नंतर 'दूरदर्शन' असे केले गेले. प्रत्येक घटकराज्यात दूरदर्शनची केंद्रे सुरू झाली. महाराष्ट्रात २ ऑक्टोबर १९७२ रोजी मुंबई दूरदर्शन केंद्राचे कार्यक्रम सुरू झाले.

(३) १५ ऑगस्ट १९८२ रोजी भारतात रंगीत दूरदर्शनचे आगमन झाले. १९८३ मध्ये राष्ट्रीय प्रक्षेपणाला सुरुवात होऊन दूरदर्शनच्या डी. डी. मेट्रो, स्पोर्ट्स्, न्यूज इत्यादी वाहिन्या व दहा प्रादेशिक वाहिन्या सुरू झाल्या.

(४) केंद्र सरकारचीच मालकी असलेल्या या क्षेत्रात १९९१ मध्ये खासगी वाहिन्यांना परवानगी मिळाली. परदेशी व भारतीय खासगी वाहिन्यांना केबल तंत्राच्या माध्यमातून कार्यक्रम प्रक्षेपित करता येऊ लागले.

(५) सध्या भारतात राष्ट्रीय आणि प्रादेशिक अशा १००० हून अधिक वाहिन्या कार्यक्रम प्रक्षेपित करीत असतात.

(६) खेळ, बातम्या, गाणी व चित्रपट, धार्मिक व मनोरंजनपर कार्यक्रम अशा विषयांना वाहिलेल्या स्वतंत्र व विविध भाषांतून चालणाऱ्या वाहिन्या चोवीस तास कार्यक्रम प्रक्षेपित करीत असतात.

**(4)** मैदानी खेळ व बैठे खेळ यांत पुढील बाबतींत फरक आहे :

| क्र. | मैदानी खेळ | बैठे खेळ |
|---|---|---|
| १. | मैदानी खेळ मैदानात उभे राहून खेळायचे असतात. | बैठे खेळ बसून खेळावे लागतात व ते घरात, मोकळ्या जागेत, पारावर कोठेही खेळता येतात. |
| २. | मैदानी खेळांसाठी कसरतीची व कौशल्याची अधिक गरज असते. | बैठ्या खेळांत तुलनेने कमी कसरतीची व कौशल्याची गरज असते. |
| ३. | मैदानी खेळांना शारीरिक क्षमतेची, शक्तीची गरज असते. | या खेळांना शारीरिक क्षमतेची, शक्तीची गरज नसते. |
| ४. | शक्ती अधिक खर्च झाल्याने या खेळांत थकवा लवकर येतो. | शक्तीची गरज नसल्याने या खेळांमध्ये थकवा लवकर येत नाही. |
| ५. | मैदानी खेळांत थरारकता, रोमांच असतो. आनंदही अधिक मिळतो. | बैठ्या खेळांत थरारकता नसते. रोमांच नसल्याने आनंद कमी मिळतो. |
| ६. | मैदानी खेळांत शारीरिक कौशल्याची गरज असल्याने प्रशिक्षणाची, सरावाची गरज असते. | बैठ्या खेळांना शारीरिक कौशल्याची गरज नसल्याने प्रशिक्षण व सरावाची तितकीशी गरज नसते. |
| ७. | मैदानी खेळांमध्ये कबड्डी, हॉकी, खो-खो, क्रिकेट अशा देशी-विदेशी खेळांचा समावेश होतो. | बैठ्या खेळांत कॅरम, बुद्धिबळ, सारीपाट, पत्ते इत्यादी खेळांचा समावेश होतो. |
| ८. | बहुतेक सर्व मैदानी खेळांच्या स्थानिक व आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित केल्या जातात. | कॅरम, बुद्धिबळ अशा मोजक्याच बैठ्या खेळांच्या स्पर्धा सोडल्यास अन्य बैठ्या खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या जात नाहीत. |

(**टीप :** *उत्तरात फरकाचे कोणतेही सहा मुद्दे लिहिणे अपेक्षित आहे.*)

## प्र. 6.

(1) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी <u>५० टक्के</u> जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.

(2) शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी <u>हरितक्रांती</u> करण्यात आली.

## प्र. 7.

**(1)** हे विधान <u>चूक</u> आहे; कारण—

(१) लोकशाही अधिक सुदृढ होण्यासाठी आणि नागरिक व शासन यांचा परस्परांवरील विश्वास वाढण्यासाठी शासन काय करीत आहे, हे नागरिकांना माहीत असणे आवश्यक असते.

(२) पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही चांगल्या शासनाची वैशिष्ट्ये या अधिकारामुळे प्रत्यक्षात येतात.

(३) शासनाचे व्यवहार अधिक खुले होण्यास या अधिकारामुळे मदत झाली; म्हणून माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी झाली आहे.

**(2)** हे विधान <u>बरोबर</u> आहे; कारण—

(१) आचारसंहिता लागू केल्यामुळे निवडणुका खुल्या वातावरणात व निष्पक्ष पद्धतीने घेता येतात.

(२) निवडणुकीच्या काळात गैरप्रकारांना आळा घालता येतो.

(३) धाकदपटशा, दहशत यांपासून सामान्य मतदाराला दिलासा मिळून तो मुक्त वातावरणात मतदान करू शकतो. म्हणून निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करतो.

**(3)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) सार्वजनिक प्रश्नांच्या निराकरणासाठी एक वा अनेक व्यक्ती संघटित होऊन सामूहिक आंदोलन उभे करतात.

(२) सामाजिक प्रश्नांसंदर्भातील सर्व माहिती आंदोलनातील कार्यकर्ते शासनाला देत असतात.

(३) चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे शासनाला त्याची दखल घ्यावीच लागते.

(४) शासनाच्या निर्णयांना, धोरणांना विरोध करण्यासाठी चळवळी उभ्या राहतात. लोकशाही पद्धतीतच जनतेला प्रतिकार करण्याचा हक्क असतो. म्हणून लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्त्व असते.

## प्र. 8. (अ)

**(1) प्रादेशिक पक्ष :**

(१) विशिष्ट प्रदेशाच्या वेगळेपणाचा अभिमान बाळगणाऱ्या व त्या प्रदेशाचा विकास करण्यासाठी सत्तेच्या स्पर्धेत उतरणाऱ्या राजकीय गटांना 'प्रादेशिक पक्ष' असे म्हणतात.

(२) या पक्षांचा आपल्या प्रदेशापुरता मर्यादित प्रभाव असतो. आपल्या प्रदेशाच्या विकासाबरोबरच आपल्या प्रदेशाला स्वायत्तता असावी, असा या पक्षांचा आग्रह असतो.

(३) आपल्या प्रदेशात प्रभावी भूमिका घेऊन हे पक्ष आता राष्ट्रीय राजकारणातही आपला प्रभाव टाकू लागले आहेत.

(४) प्रादेशिक पक्षांचा प्रवास फुटीरता, स्वायत्तता आणि मुख्य प्रवाहात सामील होणे अशा टप्प्यांमधून होत आहे.

**(2) ग्राहक चळवळ :**


(१) अर्थव्यवस्थेतील बदलांचा आणि बदललेल्या समाजव्यवस्थेचा ग्राहकांवर परिणाम होत असतो.

(२) भेसळ, वस्तूंच्या वाढवलेल्या किमती, वजन-मापातील फसवणूक, वस्तूंचा कमी दर्जा पण अधिक किमती इत्यादींसारख्या अनेक समस्यांना ग्राहकांना तोंड द्यावे लागते.


(३) अशा फसवणुकीपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी १९८६ साली ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर ग्राहकांना आपल्या हक्कांची जाणीव व्हावी व त्यांचे संरक्षण व्हावे, यासाठी 'ग्राहक चळवळ' अस्तित्वात आली.

## प्र. 8. (ब) संकल्पनाचित्रे :

**(1)**



**(2)**




**प्र. 9.**

**(1)** (१) विधानसभा आणि लोकसभा यांच्या निवडणुकांसाठी मतदारसंघ निर्माण करण्याचे काम निवडणूक आयोगाचे असते.

(२) निवडणूक आयोगाने सुरुवातीच्या काळात हे मतदारसंघ निश्चित केले. परंतु काळाच्या ओघात उद्योग-व्यवसायांच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले आहे.

(३) खेड्यांतून शहरांकडे हे स्थलांतर झाल्याने एखादया मतदारसंघातील मतदारांची संख्या घटते; तर अन्य काही ठिकाणी ती प्रचंड वाढते. यामुळे मतदारसंघ संतुलित राहत नाहीत. म्हणून मतदारसंघांची पुनर्रचना करावी लागते.

(४) हे मतदारसंघ निर्माण करण्याचे वा त्यांची पुनर्रचना करण्याचे काम निवडणूक आयोगाची परिसीमन समिती करते.

**(2)** राजकीय पक्षांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे—

(१) निवडणुकांच्या माध्यमातून सत्ता प्राप्त करणे हे राजकीय पक्षांचे मुख्य उद्दिष्ट असते.

(२) प्रत्येक राजकीय पक्षाची विशिष्ट विचारसरणी व धोरण असते.

(३) आपल्या विचारसरणीप्रमाणे प्रत्येक पक्ष आपल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करीत असतो.

(४) निवडणुकीत बहुमत मिळवणारा पक्ष सत्ताधारी बनतो; तर अल्पमतातील पक्ष विरोधी पक्ष म्हणून कार्य करतात.

(५) राजकीय पक्ष सरकार व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करून जनमताचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करतात.

---

❋ ❋ ❋